# गोप्या आणि मिरी

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

**गोप्या आणि मिरी : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये २२०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

## अनुक्रमणिका

- गोप्या /५
- मिरी /८१

✦✦

# गोप्या

# अनमोल ठेवा

गुरुजींनी विविध प्रकारचे लिखाण त्यांच्या आयुष्यात केले. लहान मुलांसाठी त्यांनी लिहिलेल्या गोष्टी हा आपला एक अनमोल सांस्कृतिक ठेवा आहे. गेली पन्नासहूनही अधिक वर्षे प्रत्येक उमलत्या पिढीच्या हातातून ही पुस्तके गेली आहेत. आजच्या बदलत्या सांस्कृतिक वातावरणात तर या पुस्तकांचे मूल्य अधिकच वाढले आहे.

प्रत्येक सुजाण पालकाने, शिक्षकाने आपल्या मुलांनी या गोष्टी वाचाव्यात, समजून घ्याव्यात यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

साने गुरुजींच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करून आम्ही हा ठेवा आमच्या बाल-वाचकांच्या हातात देत आहोत.

## दोन शब्द

येरवडा तुरुंगात 'Meak Heritage' या नावाची एक सुंदर कादंबरी मी वाचली. फिन्लंडमधील एका विख्यात लेखकाची ती कृती. त्या गोष्टीतील शेवटचा भाग आपल्याकडील १९४२ च्या ९ ऑगस्टनंतरच्या भागासारखाच आहे. या कादंबरीतील गोष्ट मी तुरुंगात व बाहेर अनेक ठिकाणी सांगितली. अनेक छात्रालयांतून सांगितली. सर्वांना ती आवडे. ती गोष्ट मी जशी सांगत असे, तशीच लिहून काढून आज प्रसिद्धीसाठी देत आहे. मूळची कादंबरी माझ्याबरोबर नाही. फक्त सूत्र आहे. मूळच्या सूत्राचा आधार घेऊन माझ्या भाषेत मी मांडून देत आहे. 'आवडत्या गोष्टीं'तील हा दुसरा भाग सर्वांना आवडतो.

**– साने गुरुजी**

# गोप्याचा जन्म

त्या गावचे नाव गोपाळपूर. गाव सुंदर होता. गावाला नदी होती. नदीचे नाव गुणगुणी. उन्हाळ्यातही नदीची गोड गुणगुण सुरू असे. नदीच्या काठाने कितीतरी मळे होते. गावची जमीन सुपीक होती. काळीभोर जमीन. परंतु जमीन जमीनदारांच्या हातात होती. सावकारांच्या हातांत होती; शेतकरी नावाचेच शेतकरी होते. ते जवळजवळ शेतमजूर झाले होते. दिवसभर राबावे, कष्टावे; परंतु पोटभर खायला नसावे, अशी त्यांची स्थिती होती.

त्या गोपाळपुरात एक सुखी शेतकरी होता. त्याचे नाव बाळा. त्याचे घरदार होते. त्याची शेतीवाडी होती. परंतु त्याला दु:ख होते. त्याला मूलबाळ नव्हते. त्याची पहिली बायको मेली. त्याने आशेने दुसरे लग्न केले. काही वर्षे गेली; परंतु मूलबाळ झाले नाही आणि ही दुसरी बायकोही मरण पावली. बाळाने तिसरी बायको केली. काही वर्षांनी तीही मूलबाळ न देता देवाघरी गेली. बाळा दु:खी असे. मेल्यावर आपणाला पाणी कोण देईल असे मनात येऊन तो कष्टी होई. प्रत्येक नवीन लग्न करताना त्याला थोडीफार शेतीवाडी विकावी लागे. हळूहळू तो गरीब झाला. तरीही पुन्हा लग्न करायची त्याला इच्छा होती. तो एका सावकाराकडे थोडे पैसे मागण्यासाठी गेला. सावकार पैसे देईना.

'नाही म्हणू नका. पुन्हा लग्न करायचा माझा विचार आहे. गरिबाचे लग्न करून द्यावे. पुण्य जोडावे.' बाळा म्हणाला.

''अरे, लग्न करणार तरी किती वेळा? आणि आता तू म्हातारा झालास. तुझे लग्न लावून पुण्य मिळण्याऐवजी पाप मात्र पदरात यायचे. तू उद्या मेलास तर तुझ्या बायकोचे काय होईल? काय खाईल? सारी शेतीवाडी तर तुझी गेली.

आता हे घर फक्त राहिले आहे. आता या लग्नाच्या फंदात पडू नकोस.' सावकार म्हणाला.

'मी तर पुन्हा लग्न करणार.'

'अरे, तुला कोण देणार मुलगी?'

'आपल्या देशात मुलींना तोटा नाही. प्रेताजवळसुद्धा लग्ने लावायला मुली मिळतील.'

अशी बोलणीचालणी बराच वेळ चालली आणि बाळा थोडे पैसे कर्ज म्हणून घेऊन गेलाच. तो लग्नाच्या खटपटीत गर्क झाला. परंतु त्याला बायको मिळेना. लोक त्याला चिडवीत, हसत. बाळाही त्यांच्यावर संतापे.

'लग्न लावून दाखवीन तरच मी खरा बाळा–' असे तो म्हणे.

एके दिवशी सायंकाळी तो एकटाच नदीकाठाने फिरत जात होता. आपल्या विचारांत तो गुंग होता. तो बराच दूर आला. अंधार पडू लागला होता. नदी वाहत होती. त्या बाजूला खोल डोह होता. बाळा जात होता, तो त्याला नदीतीरी कोणीतरी दिसले. कोण होते तेथे? अशा अंधारात त्या डोहाच्या बाजूला कोण आले होते?

'कोण आहे?' बाळाने विचारले.

'मी एक दुर्दैवी स्त्री आहे.'

'या बाजूला कशाला?'

'डोहात आधार मिळतो का पाहायला.'

'तू का जीव देणार? तुला का कोणी नाही?'

'मला कोणी नाही. मी या गावची नाही. मी दूरची आहे. काही महिन्यांपूर्वी माझा नवरा मरण पावला. दिरांनी मला घालवून दिले. मी भावाच्या घरी गेले. भावानेही मला थारा दिला नाही. मी या गावी आले. मोलमजुरी करते. एका झोपडीत राहते. परंतु येथे मला कोण आहे? प्रेमाचे, मायेचे मला कोण आहे? कोणी गोड शब्द बोलायला नाही. कोणी विचारपूस करायला नाही. दिवसभर मी काम करते. संध्याकाळी कधी नदीकाठी येऊन बसते नि रडते. आज मला फारच एकटे वाटले आणि डोहात जीव द्यावा असे ठरवून आले. तुम्ही माझी कशाला चौकशी करता? दुर्दैवी माणसाची कोणी विचारपूस करू नये. माझे दुर्दैव तुम्हालाही बाधायचे. जा, माझ्यापासून दूर जा.'



'तुला जगात खरोखरच कोणी नाही?'

'खरोखरच कोणी नाही.'

'तर मग तू माझी हो. मीही एकटाच आहे. मला मूल ना बाळ. तीन बायका मेल्या. तू माझी चौथी बायको हो. तुला मी, मला तू. तुझ्याजवळ मी गोड बोलेन, माझ्याजवळ तू गोड बोल आणि मला मुलगा दे. तीन बायका केल्या. परंतु फुकट. मूलबाळ न देता त्या मेल्या. तू तसे करू नकोस. चल माझ्याबरोबर. मी तुझ्याशी लग्न लावतो.'

'असे कसे होईल? मी एक दुर्दैवी दरिद्री बाई.'

'मी तरी कोठे मोठा कुबेर आहे? दुर्दैवाची मला भीती नाही. चल, कदाचित् सारे चांगले व्हायचे असेल. मला नाही म्हणू नकोस. मला बायको मिळत नाही म्हणून मी दु:खी आहे. माझे दु:ख, माझे दुर्दैव तू दूर कर.'

'तुम्ही थट्टा करता की मनापासून बोलता?'

'मी नेहमी मनापासून बोलत आलो आहे. लपंडाव वगैरे माझ्याजवळ नाही. शेतकऱ्याजवळ का लपंडाव असतो? शेतकरी साधा सरळ माणूस. चल, रडू नको. माझी बायको हो नि सुखी हो. मलाही मुलगा देऊन सुखी कर.'

'चला. तुमच्याबरोबर येते.

'छान. चल.'

ती दोघे गावात आली. ती दुर्दैवी स्त्री आपल्या झोपडीत गेली. दुसऱ्या दिवशी त्या दोघांचे लग्न लागले. बाळाच्या घरी त्याची नवी बायको राहायला आली. सावित्री तिचे नाव. ती कष्टाळू होती. तिने घरची झाडलोट केली. सारे स्वच्छ केले. पुढचे अंगण सारवले. तुळशी वृंदावन रंगवले. बाळाच्या घराला कळा आली.

'मिळवली की नाही बायको?' तो लोकांना मिशीवर पीळ देऊन म्हणे.

'परंतु उद्या त्या बायकोचे काय होईल? घरदार सावकाराच्या ताब्यात जाईल. तू जाशील मरून. तुझ्या बायकोचे हाल मग कुत्राही खाणार नाही.' लोक म्हणत.

'नाहीतरी ती काय मोठी सुखात होती? नदीत जीव द्यायला निघालेली ती एक भिकारीण. थोडे दिवस तरी मी तिला सुख देत आहे. माझ्या मोठ्या घरात ती आनंदाने राहात आहे आणि लवकरच तिला मूल होईल. माझे हेतू पूर्ण होतील. मी मेलो तरी तिच्याजवळ तिचे बाळ राहील. त्याच्यासाठी ती जगेल. जगण्यासारखे तिच्याजवळ

काही नव्हते. आता असे तिला वाटणार नाही. मी तिला इतर इस्टेट जरी ठेवली नाही, तरी ही अमोल संपत्ती देऊन जाणार आहे.' असे बाळा त्यांना उत्तर देई.

सावित्री घरातील सारे काम करी. ती थकून जाई. एके दिवशी तिला बरे नव्हते. ती आडवी झाली होती. बाळा बाहेरून आला. तो संतापून आला होता. कोणीतरी त्याचा अपमान केला होता. अपमानाचा सूड घ्यायला घरातील बायकोशिवाय दुसरी जागा त्याला नव्हती. तो आला तरी सावित्री उठली नाही. बाळाला तो अधिकच अपमान वाटला.

'मी बाहेरून आलो, दिसत नाही का? ऊठ की जरा. बाहेर त्या गाईला चाराही घातला नाहीस. तिचे शेणही ओढून ठेवले नाहीस. मोलमजुरी ना करीत होतीस? येथे सुखात लोळायला आलीस? ऊठ.'

'मला बरे वाटत नाही. पोटही जरा दुखत आहे. पुरुषांना काय कळते?'

'अधिक बोलू नकोस. बायका नि गोठ्यातील गाई सारख्याच. ऊठ, का मारू कमरेत लाथ? तीन बायका केल्या; परंतु माझ्यापुढे त्या ब्र काढीत नसत. थरथरत असत. तू चुरूचुरू बोलतेस. झोडपून काढीन. ऊठ.'

बिचारी सावित्री उठली. जगात कोणी प्रेम करायला नाही म्हणून तिने हे लग्न केले; परंतु येथे निराळेच धिंडवडे सुरू झाले. ती गोठ्यात गेली. गायीला पाणी पाजले; तिला चारा घातला; शेण ओढून ठेवले. ती घरात आली. दाव्याला बांधून ठेवलेली गाय; आपणही तशाच, असे तिच्या मनात आले. लग्नापूर्वी ती स्वतंत्र होती. आज तेही स्वातंत्र्य राहिले नाही. या नव्या नवऱ्याच्या लहरीप्रमाणे तिला राहणे प्राप्त होते.

काही दिवस गेले. सावित्री आता लवकरच बाळंतीण होणार असे दिसत होते. एके दिवशी रात्री भाकर खाताना बाळा तिला म्हणाला,

'मुलगा झाला तर बरे आहे. मुलगी झाली तर बघ. तुला त्या मुलीसह देईन विहिरीत ढकलून; नाहीतर त्या गुणगुणीच्या डोहात. त्या डोहातच जीव द्यायला जात होतीस. होय ना? विचार करून ठेव. पोटी मुलगा आला पाहिजे. त्याचे नाव गोपाळ ठेवीन. या गोपाळपूरचा तो राजा होईल. समजले ना?'

'परंतु माझ्या हातचे का आहे?'

'मग कोणाच्या हातचे? जास्त बोलू नकोस. माझी इच्छा पुरी कर. मला मुलगा हवा आहे. ती किती वर्षांची माझी इच्छा आहे. ती इच्छा पुरी व्हावी म्हणून



मी पुन्हा पुन्हा लग्ने केली. ती इच्छा का तू पुरी नाही करणार? तेवढ्यासाठी तर तुझ्याशी लग्न केले. भिकारीण तर होतीस. परंतु वाटले, की तू मुलगा देशील, याद राख!'

सावित्री भीत होती. ती डोळ्यांत पाणी आणून देवाला म्हणे, 'देवा नारायणा, मुलगा होऊदे. त्यांची इच्छा पुरी होऊदे. आणखी हाल आता नकोत.'

एके दिवशी रात्री तिचे पोट दुखू लागले. देवा, मुलगा दे, मुलगा दे, असे ती मनात म्हणत होती. या वेदनांतही पतीची इच्छा तिच्या डोळ्यांसमोर होती आणि खरेच तिला मुलगा झाला. बाळाचे रडणे बाहेर ऐकू आले.

'मुलगा की मुलगी?' बाळाने बाहेरून विचारले.

'मुलगा.' सुईण म्हणाली.

'शाबास!' तो म्हणाला.

कर्ज काढून बाळाने गावात साखर वाटली. लोक त्याला हसत होते; परंतु बाळाचे तिकडे लक्ष नव्हते.

'अरे मुलगा झाला, परंतु उद्या तो खाईल काय? तुला स्वर्गात पाणी मिळेल. परंतु मुलगा येथे उपाशी मरेल, त्याचे काय? शेतभात राहिले नाही. घरदार सावकाराकडे जाईल. पोराला भीक मागावी लागेल. साखर वाटतो आहे! काही अक्कल आहे का?' लोक म्हणत.

'माझा मुलगा पराक्रमी होईल. या गावचा राजा होईल. गोपाळपूरचा राजा. त्याचे नाव मी गोपाळ ठेवणार आहे. जणू हा त्याचाच गाव. तो शेतकऱ्यांचे राज्य स्थापील. गोरगरिबांना सुखी करील.' बाळा म्हणे.

आज मुलाला पाळण्यात घालायचे होते. बाळाने रंगीत पाळणा टांगला होता. त्याने थाटाने बारसे केले आणि खरोखरीच मुलाचे नाव गोपाळ ठेवण्यात आले. गोपाळ वाढू लागला. लहानाचा मोठा होऊ लागला. एका सावकाराकडून आणखी थोडे कर्ज बाळाने आणले. गोपाळला त्याने बाळलेणे केले. सुंदर केले. तो लहान बाळसेदार गोपाळ मोठा सुंदर दिसे. त्याचे डोळे काळेभोर होते. बाळाला मुलाचे वेड लागले. गोपाळला घेऊन तो सर्वत्र जाई. सर्वांना तो दाखवी.

दुपारी जेवण झाल्यावर बाळा त्याला जवळ घेऊन बसे. तो चिमुकला गोपाळ बाळाच्या मिशा ओढी. बापाचा आनंद गगनात मावत नसे. गोपाळ रांगू लागला.

घरातील सामान तो उडवी. पाटीतील दाणे फेकी. सावित्री त्याला रागे भरी; परंतु बाळाला ते सहन होत नसे.

'खबरदार त्याला रागे भरशील तर! तो माझा मुलगा आहे. माझी इच्छा पुरी करायला तो जन्मला आहे. त्याला चापट मारशील तर तुझी चामडी लोळवीन, समजलीस?' अशी धमकी बाळा सावित्रीला देत असे.

गोपाळला आता पाय फुटले. तो रस्त्यात जाई. आई त्याला शोधीत फिरे. मग ती त्याला उचलून आणी. गोपाळ गाईंच्या गोठ्यात जाई. गवताशी खेळे. गाईंच्या शेणात हात भरी. सावित्री त्याला उचलून आणी. मोठा खोडसाळ होता गोपाळ.

बाळा कधी त्याला जवळ घेऊन बोलायला शिकवी. आई, बाबा असे म्हणायला शिकवी. तो चिमणा गोपाळ हसे आणि बापाला अधिकच स्फूर्ती येई. बाळा आपल्या मुलाला म्हणे,

'गोपाळ, तू पुढे मोठा हो. होशील ना मोठा? तू शेतकऱ्याचा मुलगा आहेस. आजकाल शेतकऱ्याची मान खाली झाली आहे. तू ती उंच कर. शेतकऱ्यांचे राज्य स्थापन कर. शेतकरी म्हणजे पाताळात दडपलेला बळी राजा. या पाताळात दडपलेल्या शेतकऱ्याला वर आण. या गोपाळपूरचा तू राजा हो. शेतकऱ्यांचा राजा, करशील हे सारं? पित्याची इच्छा पूर्ण करशील ना? काय रे?''

बापाचे बोलणे ऐकून बाळ हसे; बापाचे डोळे झाकी. त्याचे ते भले मोठे नाक तो ओढी. विशेषत: त्या मिशा बाळ गोपाळला फार आवडत. त्या दोन्ही हातांनी तो धरी आणि गोड गोड हसे. सावित्रीला हाक मारून म्हणे,

'हा बघ हसतो. याला सारे समजते. माझे बोलणे ऐकून लबाड हसतो. लहानसा आहे तरी त्याला सारे समजते. उद्या शाळेत जायला लागला म्हणजे किती समजू शकेल! शहाणा होईल, बाळ हुशार होईल. होशील ना रे?'

असे म्हणून बाळा मुलाचे मुके घेई.

गोपाळ दोन-तीन वर्षांचा झाला; परंतु बाळा आता आजारी पडला. सावित्री नवऱ्याची सेवा करीत होती. घरात पैसा नाही. सावित्री मोलमजुरी करून चार दिडक्या मिळवून आणी आणि गाडा ढकलीत होती. परंतु बाळा बरा होईल कोणाला वाटत नव्हते आणि शेवटी घटका आली.

'माझ्याजवळ गोपाळ दे.' तो क्षीण स्वरात म्हणाला.



'हा घ्या!' सावित्री म्हणाली.

क्षीण हातांनी पित्याने मुलाला जवळ घेतले. गोपाळचा मुका घेऊन तो म्हणाला, 'मोठा हो राजा. शेतकऱ्याची मान उंच कर. देवाघरी जाणाऱ्या तुझ्या पित्याची हीच इच्छा. ती पूर्ण कर.'

बाळ हसला.

'बघ त्याला समजते.' मरणोन्मुख बाळा म्हणाला.

✦✦✦

# मामाच्या घरी

गोपाळचा बाप मरण पावला. सावित्री मुलाकडे पाहून दिवस कंठीत होती. पुन्हा ती एकटी झाली. आपण दुर्दैवी आहोत, असे पुन्हा तिच्या मनात सारखे येऊ लागले. हा बाळ आपल्याजवळ राहिला तर त्याचेही बरेवाईट व्हायचे, असे तिच्या मनात राहून राहून येई. त्या मोठ्या घरात ती नि गोपाळ दोनच जीव. गोठ्यात गाय होती. परंतु तिने गाय विकून टाकली. तिला मजुरी करायला जावे लागे. एवढे मोठे घर असून काय उपयोग? मजुरीही रोज मिळत नसे. लोक तिची टिंगल करीत. कोणी वाटेल ते बोलत. ती सारे सहन करी.

परंतु ते राहते घरही गेले. त्या घरावर सावकारांच्या जप्त्या आल्या. घरातून सावित्री मुलाला घेऊन बाहेर पडली. आता कोठे राहायचे? तिला कोठे आधार दिसेना. शेवटी एके दिवशी मुलाला घेऊन ती गावाबाहेर पडली. त्या गुणगुणी नदीच्या तीराने ती जात होती. मध्येच बाळाला ती कडेवर उचलून घेई. थोड्या वेळाने त्याला ती खाली उतरी. आईच्या पाठोपाठ बाळा दगडधोंड्यांतून दुडूदुडू धावे. आई जरा लांब गेली की लहानगा गोपाळ रडू लागे. सावित्री थांबे. ती त्याला उचलून घेई. घामाघूम झालेल्या बाळाचा मुका घेऊन ती म्हणे, 'अशा दुर्दैवी आईच्या पोटी कशाला आलास बाळ?'

बाळ आईला घट्ट धरून ठेवी. जणू आई कोठे जाईल असे त्याला वाटे. जाता जाता दिवस मावळला. अंधार पडू लागला. गोपाळला उचलून घेऊन ती दु:खी माता जात होती. किती दूर जाणार, कोठे जाणार ती? ती आता थकली, दमली. पायांना फोड आले. परंतु अद्याप गाव दिसेना. किती लांब आहे गाव? कोणत्या गावी तिला जायचे आहे? रानात कोल्हे ओरडत होते. रातकिडे किर्र आवाज करीत



होते. गोपाळ आईला चिकटून होता. चांदणेही आज नव्हते. परंतु निरभ्र आकाशातील तारे चमचम करीत होते. त्यांच्या उजेडात ती प्रेममूर्ती माता जात होती. गार वारा सुटला. बाळाला थंडी लागत होती. आपल्या पदराचे पांघरूण घालून माता गोपाळला सांभाळीत होती.

आता दूरचे दिवे दिसू लागले. गुरांच्या गळ्यातील घंटांचे आवाज कानांवर येऊ लागले. कोणतातरी गाव आला. हाच का गाव सावित्रीला पाहिजे होता? ती झपझप पावले टाकीत जात होती. ती गावात शिरली. तो मोठा गाव होता. सर्वत्र गजबज होती. शेतांतून गाड्या गावात येत होत्या. गुरांना शेतकरी दाणावैरण घालीत होते. कोठे दूध काढीत होते. कोठे मजुरांना मजुरी देण्यात येत होती. त्या मातेचे कशाकडेही लक्ष नव्हते. शेवटी ती एका मोठ्या घराजवळ थांबली. कोणाचे होते ते घर? कोण राहात होते तेथे? गडीमाणसांची येथे ये-जा सुरू होती.

'कोण आहे तिथे उभे? चोर की काय?' कोणी विचारले.

'मी आहे.' सावित्री म्हणाली.

'मी म्हणजे कोण?'

'मी सावित्री. दादाकडे आले आहे.'

इतक्यात घराचा मालक तेथे आला. गडबड ऐकून तोच माडीवरून खाली आला.

'काय आहे रे गडबड?' त्याने विचारले.

'दादा, मी आले आहे.'

'कोण? सावित्री?'

'होय, दादा.'

'तू पुन्हा येथे कशाला आलीस? काही वर्षांपूर्वी तू एकदा आली होतीस. तुझा पहिला नवरा तेव्हा मेला होता. परंतु मी तुला घरात ठेवले नाही. तू पांढऱ्या पायांची अवदसा आहेस. जाशील तेथे नि:संतान करशील. तुला मी घालवून लावले होते. पुढे कळले की तू पुन्हा दुसरा नवरा केलास आणि तोही मेल्याचे परवा कळले. परंतु येथे कशाला आलीस? भावाचीच सत्त्वपरीक्षा घ्यायला आलीस वाटते? तू चालती हो. माझ्या भरल्या घरात दुर्दैव नको.'